**नि.दि.दा. क्र. ८३/२०२३**
सुनील वि. मोहन
**निशाणी क्र. ७६ लगत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार आजिनाथ त्रिंबक गुडे यांचा उलटतपास शपथेवर प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. बी. बी. सुर्यवंशी यांचेमार्फत सुरु:–</u>**

१. गट क्र. १५० चे एकुण क्षेत्रफळ किती आहे हे मला सांगता येणार नाही. आवार–पिंपरी गावाच्या पश्चिमेस कुर्डूवाडी–परंडा रस्ता आहे. गट क्र. १५० सदर रोडच्या पश्चिमेस आहे. आवार–पिंपरी गावाच्या दक्षिणेकडुन नदी आहे. गट क्र. १५० च्या दक्षिणेला सदरची नदी येते. गट क्र. १५० च्या पुर्वेला कुर्डूवाडी–परंडा रस्ता, पश्चिमेस प्रतिवादी यांची उर्वरीत जमीन, दक्षिणेस राजाभाऊ काळे यांची जमीन, उत्तरेस नागनाथ जाधव यांनी विकलेली जमीन आहे. गट क्र. १५० च्या चारही बाजुलगत माझी जमिन नाही. माझ्या जमिनीचा गट क्र. ३३ आहे. गट क्र. ३३ च्या पुर्वेला माझ्या पाहुण्याने घेतलेली जमीन आहे, पश्चिमेस दिगंबर गुडे यांची जमीन, उत्तरेस नदी, दक्षिणेस गाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी जमीन कुर्डूवाडी–परंडा रोडलगत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकुर वादीच्या सांगण्यावरुन लिहिला आहे. भिकाजी मसलकर, चंद्रप्रभु मसलकर, विनोद घळ्के व वादीला करुन दिलेल्या कराराची तारीख मला सांगता येत नाही. घळ्के यांना जमीन खरेदी दिली, वादी सुनिल यांना ९९ वर्षाच्या करारावर दिली व बाकीच्यांना कुळ म्हणुन जमीन दिली. सुनिल यांना दिलेल्या करारनाम्यावर माझी सही नाही. तो करारनामा मी आजतागायत पाहिला नाही. वादी सुनिल यांची ग्रामपंचायतने नोंद सन २००८ पुर्वी घेतली आहे, परंतु निश्चित तारीख सांगता येत नाही. नोंद घेतलेला कागद आजपर्यंत मी पाहिला नाही. नोंद घेतल्याबद्दल माझ्या शपथपत्रातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला आहे. वादीने कर भरल्याची पावती मी आजतागायत पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीची ग्रामपंचायतने नोंद घेतली, वादीने ग्रामपंचायतला कर भरला हे माझी ऐकीव माहिती आहे.

२. पंचनाम्यावर पंच म्हणुन माझी सही नाही. शपथपत्रात नमुद केलेला पंचनामा मी पहिल्या तारखेला कोर्टात वाचुन पाहिला आहे. सदरचा पंचनामा मी वादीचे विधीज्ञ माढेकर यांच्याकडुन घेवून वाचुन पाहिला आहे. वादी सुनिल हे माझ्या लांबच्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझ्या भावकीतील असल्याने त्याला मदत व्हावी म्हणुन खोटे प्रतिज्ञापत्र दिले व खोटी साक्ष देत आहे. दावा मिळकतीत वादीचे पत्र्याचे शेड, कडब्याची गंज, खताचा उकंडा व शेती अवजारे ठेवून वादी उपभोग घेत होता याबाबत कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही व कागदोपत्री पुरावा पाहिला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मी जागेवर स्वतः पाहिलेला आहे. गट क्र. १५० मध्ये आता प्रतिवादीचे घर

आहे. हे म्हणणे खरे नाही की, हे घर सन २०२०–२१ साली बांधले आहे. सदर घरामध्ये प्रतिवादी काळेचे कुटूंब आता राहतात. हे म्हणणे खरे नाही की, ते सन २०२०–२०२१ सालापासुन राहतात. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १५० व ३३ मधुन परंडा – कुर्डूवाडी रस्ता गेलेला आहे हे मी शपथपत्रात खोटे नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने भिकाजी मसलकर, चंद्रप्रभु मसलकर, विनोद घळ्के व वादी सुनील गुडे यांना कराराने व खरेदीने जागा दिलेली आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरील लोकांचा त्या जागेवर कब्जा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २००८ पासुन वादी सुनील गुडे यांचा गट क्र. १५० मध्ये ४गुंठ्यावर कब्जा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जागेत वादीने काटेरी कुंपण मारुन, पत्र्याचे शेड, कडब्याची गंज, खताचा उकंडा व शेती अवजारे ठेवुन उपभोग घेत आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या नावाची नोंद ग्रामपंचायत आवार–पिंपरी यांनी घेतली होती, तसेच वादी कर भरत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१५ मध्ये वादीने दिलेल्या पत्रावरुन महसुलने वादीचा पंचनामा केला व त्यामध्ये वादीचा ४आर क्षेत्रावर ताबा होता व तो ताबा सन २०२१ पर्यंत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२१ साली प्रतिवादीने वादीचे पत्र्याचे शेड काढुन त्यावर बांधकाम केले हे मी खोटे सांगत आहे.

३. मला कोर्टाचे समन्स आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सुनीलच्या सांगण्यावरुन साक्षीसाठी आलो आहे. मी साक्ष देण्याकरीता स्वतः कोर्टात आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मदत व्हावी म्हणुन मी साक्षीला आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन माझ्या शपथपत्रातील मजकुर लिहिला. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील मजकुर खोटा आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DEEPAK MADHUKAR GIRI
Date: 2026.07.27 16:34:41 +0530

दिनांकः २७.०७.२०२६

**(डी. एम. गिरी)**
सह दिवाणी न्यायालय व स्तर, परंडा.